व्यवसाय सुलभता (EoDB) उपक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून सुचविण्यात आलेल्या सुधारणांची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन परिपत्रक क्र.: केसुअ २०२४/प्र.क्र.७७/ उद्योग-३**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. : १५ ऑक्टोबर, २०२४

केंद्र शासनाच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत व्यवसाय सुलभता (Ease of Doing Business) कार्यक्रम राबविला जात आहे. सदर कार्यक्रमाचा उद्देश देशामध्ये तसेच राज्यांमध्ये अनुकुल व्यावसायिक परिसंस्था वाढविण्याकरीता तसेच सदर प्रक्रियेचे नियमन करण्याकरीता सुधारणा सुचविणे असा आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत वेळोवेळी व्यवसाय सुलभता उपक्रमांतर्गत सुधारणा सुचविल्या जातात आणि सदर सुधारणाच्या अंमलबजावणीच्या आधारे राज्यांचे क्रमवारी निश्चित केली जाते.

त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत व्यवसाय सुलभता उपक्रमांतर्गत सुचविलेल्या सुधारणांची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्याकरीता सुचविण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे काही सूचना निर्गमित येत आहेत.

**परिपत्रक** :

व्यवसाय सुलभीकरणांतर्गत सुरू करण्यात आलेल्या एकल खिडकी प्रणाली (Single Window System) वर उद्योजकांच्या/ व्यवसायिकांच्या सोयीकरीता विविध माहिती, परवानगी, Module उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. नविन अथवा प्रस्थापित उद्योगांना विभागांकडून देण्यात येणारे परवाने/ ना-हरकत प्रमाणपत्रे/ परवानगी याबाबत राज्यामध्ये मैत्री कक्षाच्या एक खिडकी प्रणालीअंतर्गत Know your Approval module या सेवेचा समावेश केलेला आहे. सदर सेवा ही NSWS शी संलग्न करण्यात आलेली आहे. गुंतवणूकदाराने गुंतवणकीबाबत सादर केलेली माहिती जसे की, प्रकार, रोजगार, जोखिम वर्गवारी, गुंतवणूक, घटकाचे स्थान, गुंतवणूकीचा प्रकार (देशांतर्गत अथवा परकीय गुंतवणूक) इ. तपशील सदर Module मध्ये सादर केल्यास राज्य शासनाच्या आवश्यक परवानगी/ मान्यता/ ना-हरकत याविषयीची माहिती Portal मार्फत दर्शविणे अनिवार्य करण्यात येत आहे. तसेच यासंदर्भात विभागाकडून नविन सेवा अधिसूचित केल्यास सदर सेवा ३० दिवसांच्या आत NSWS Platform वर समाविष्ठ करावी. त्यानुषंगाने मैत्री कक्षाच्या एक खिडकी प्रणालीमध्ये सदर नवीन सुविधा अद्ययावत करण्यात येईल.

२.	विभागांच्या सर्व सेवांकरीता विभागांच्या Online Wizard वर PAN आधारीत खाते निर्मीती करण्याकरीता उपाययोजना करणे अनिवार्य करण्यात येत आहे. सदर PAN हा NSWS तसेच मैत्री पोर्टल यामधील माहितीचे आदान प्रदानासाठी दुवा म्हणून वापरण्यात येईल.

३.	मैत्री तसेच NSWS पोर्टलवर Online प्रणालीमार्फत प्राप्त झालेले अर्ज/प्रश्न/ तक्रारी यांची संख्या, निकाली काढलेले अर्ज/प्रश्न /तक्रारी, त्याकरीता नियोजित कालमर्यादा, अर्जांचा/प्रश्नांचा /तक्रारींचा निपटारा करण्याकरीता लागलेला किमान कालावधी /सरासरी कालावधी/ मध्यक कालावधी/बहुलक कालावधी/ कमाल कालावधी, अनुपालन टक्केवारी, अर्जांकरीता आकारलेली गेलेले शुल्क अर्जाचा तपशील (जसे की, क्रमांक, अर्जाचा दिनांक, निकाली काढल्याचा दिनांक) इ. बाबी उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच त्यानुषंगाने त्यांचे Online Dashboard नियमितपणे (दैनिक/साप्ताहिक/पाक्षिक/मासिक) अद्यावत करावे. तसेच पोर्टलवरील माहिती अद्यावत केल्याचा दिनांक नमूद करावा.

४.	मैत्री एकल खिडकी प्रणालीद्वारे सर्व नोंदणीकृत घटकांसाठी देण्यात येणाऱ्या मंजूऱ्या/अनुज्ञप्ती/ना-हरकती इ. बाबतचा अनुपालन तक्ता स्कोअरकार्डसह तयार करण्यात यावा. त्याआधारे मैत्री प्रणालीद्वारे विहित मुदतीपूर्वी ३० दिवस अग्रीम सूचना उद्योग घटकांस पाठविण्यात याव्यात. तसेच ऑनलाईन पोर्टलवरील डॅशबोर्डवर वेळेत अनुपालने सादर न झाल्यास त्याबाबत विलंबाच्या क्षेत्रनिहाय सूचना याचा तपशील अर्जदारास देण्यात यावा. संबंधित विभागाने अनुपालनसंदर्भात बदल झाल्यास मैत्री कक्षास १५ दिवसांत कळविणे अनिवार्य राहील. त्याप्रमाणे प्रणालीमध्ये सुधारणा करण्यात यावी.

५.	मैत्री एकल खिडकी वर गुन्हेगारी संबंधित कायदे त्यामधील तरतुदीसह समाविष्ठ करावेत तसेच व्यावसायिक आणि तत्संबंधित दायित्व, गुन्ह्याचे स्वरुप, शिक्षा यासंबंधीत वर्णनात्मक तरतुदी समाविष्ठ कराव्यात. त्याबाबत अनुपालन भंगाच्या घटनांकरीता दंडात्मक तरतुदींची तपशीलवार वर्णनासह इशारा देणाऱ्या प्रणालीचा विकास करणे अनिवार्य राहील.  अधिसूचित सेवांबाबत दंडात्मक तरतुदी संदर्भात बदल झाल्यास त्याबाबत संबंधित विभागाने १५ दिवसांच्या आत मैत्री कक्षास कळविण्यात यावे.

६.	सोसायटी/ भागीदारी संस्था द्वारे गठित झालेले उद्योग घटक यांनी प्रविष्ठ केलेल्या माहितीमध्ये (जसे की, नाव, पत्ता, घटना अथवा इतर माहितीमध्ये इ.) कोणताही बदल झाल्यास त्याबाबत मैत्री कक्षाच्या पोर्टलमार्फत संबंधित विभागांच्या पोर्टल वर संदेश पाठविला जाईल, त्यानुषंगाने विभागांनी त्यांची माहिती अद्यावत करावी. अर्जदारास अतिरिक्त माहिती प्रविष्ठ करावयाची असल्यास अर्जदारास देखील एक संदेश पाठविला जाईल त्यानंतर त्यांना औपचारिक कार्यवाही सुरू करता येईल. याव्यतिरिक्त ज्या विभागाने कायद्याने असे बदल स्विकारण्यास मनाई केली आहे, ते विभाग अर्जदारांस इच्छित परवानग्यासाठी विहित कार्यपद्धती कळवतील व नविन अर्ज सादर करण्याबाबत सूचित करतील.

७.	गुंतवणूकदारांच्या सहाय्यासाठी व्यवसाय सुलभीकरणाच्या कृती आराखड्यानुसार शासन ते व्यवसाय (G२B) व व्यवसाय ते शासन (B२G) अशा दुतर्फा माहितीचे आदानप्रदान, मार्गदर्शन

यासाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. संपर्क अधिकारी म्हणून महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी गुंतवणूक प्रत्यक्षात येण्यासाठी गुंतवणूकदार, उद्योजक व व्यावसायिकांना त्यांच्या उद्योग व्यवसायाशी निगडीत प्रश्न/ तक्रारी विषयी सहाय्य करणे, आवश्यक ती सर्व माहिती विहित मुदतीत पुरविणे, परवानगी बाबत माहिती पुरविणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाबरोबर समन्वय साधून भूखंडाची माहिती देणे, त्रुटींची पुर्तता करणे, तसेच इतर सर्व बाबींसाठी वरिष्ठांमार्फत मैत्री कक्षाशी समन्वय साधणे असे कामकाज राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१०१५१७०३०५४८१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR

Digitally signed by DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C10A1E6C8FBE08C1180978BD3ED8A151ED05202D522B09B9960341C2F080906D, cn=DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2024.10.15 17:03:58 +05'30'

**( डॉ. श्री. ल. पुलकुंडवार )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, (अपिले व सुरक्षा) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, (परिवहन व बंदरे) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, कृषी, पशुसवंर्धन, दुग्ध विकास व मस्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा , कामगार व खनिकर्म विभाग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, नगर विकास विभाग १, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव, नगर विकास विभाग२, मंत्रालय, मुंबई.
१२.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.प्रधान सचिव (कामगार) उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.प्रधान सचिव, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.प्रधान सचिव, उच्च व तंत्र विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.प्रधान सचिव, (उर्जा) उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९.प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषध विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०.सचिव (कृषी), कृषी, पशुसवंर्धन, दुग्ध विकास व मस्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

२१.सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

२३.विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नविन प्रशासकीय भवन, मुंबई

२४.अतिरिक्त विकास आयुक्त (मैत्री), उद्योग संचालनालय, मुंबई

२५.सर्व उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालये (उद्योग संचालनालयाद्वारा)

२६.सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (उद्योग संचालनालयाद्वारा)

२७.निवडनस्ती (उद्योग-३)

Regarding implementation of EoDB reforms in the State

Date: 15 October 2024

Department for Promotion of Industry and Internal Trade ('DPIIT') under the Ministry of Commerce & Industry, Government of India has been driving the Ease of Doing Business program across States and Union Territories in India. The objective of the program is to implement reformative measures in the regulations and service delivery mechanism pertaining to Government-to-Business services to foster conducive business ecosystem in the country. Accordingly, reforms are suggested from time to time as part of the Ease of Doing Business initiative and the ranking of states is determined based on the implementation of the reforms.

Therefore, the following instructions are being issued in accordance with the reforms suggested under the Ease of Doing Business initiative by DPIIT.

**Circular:**

For the convenience of entrepreneurs/ businessmen, various information, permissions, modules have been made available on the single window system. Accordingly, the following instructions are mandated.

1. Under MAITRI Portal's Single Window System, 'Know your Approval' module has been developed for businesses/ industries to identify approvals/ clearances and NoCs from departments that shall be required for establishment and operationalization of business. The said service has also been implemented in National Single Window System (NSWS). The user may provide various inputs regarding the investment, such as, type of industry, number of employees, risk category, size of firm, business location, Foreign/ Domestic investor etc., subsequent to which the 'Know Your Approval' module shall display information about required approval/ clearances and NoCs from the state government. Also, in this regard, if the department notifies any new service, the said service should be included in the 'Know Your Approval' module in the NSWS platform within 30 days. Further, the same shall also be adequately reflected within the same time period in the 'Know Your Approval' module of the MAITRI Single Window System.
2. For all services of the departments, it is mandatory to create PAN based account on the online portal of departments. PAN shall serve as the unique identifier and shall be used as a link between NSWS and MAITRI Portal for information exchange.
3. Number of Applications/ Queries/ complaints received through online systems, such as, MAITRI and NSWS portals should be made available along with Applications/ Queries/ complaints approved/ resolved, notified time frame for the same, maximum duration for disposal, minimum duration for disposal, average duration for disposal, median duration for disposal, mode duration for disposal, compliance percentage, fee charged for the application, details of application (like application number, application date, date of disposal etc.). Accordingly, Online Dashboard should be updated regularly. Also, the date of updating information on the portal should be mentioned.
4. A compliance dashboard along with scorecard should be prepared in respect of approvals/ permissions/ NoCs for all registered units through MAITRI portal. Based on that, advance notices should be sent through MAITRI system to industry units 30 days prior to the due date for the compliance. Also, if the compliances are not submitted on

time on the online dashboard, the applicant should receive compliance subject wise alert of delay in compliances.

Further, it shall be mandatory for the department concerned to inform MAITRI within 15 days of any change in compliance related regulations for corresponding modification in the compliance module.

5. The laws having criminal provisions should be mapped on MAITRI single window accompanied by description of provisions related to liability, type of offence, punishment in relation to commercial and allied activities. In this regard, it would be necessary to develop an alert system with detailed penal provisions for cases of non-compliance. In case of any change in the penal provisions, the department concerned should inform MAITRI Cell within 15 days for corresponding modification in the system.

6. In case of any change in the information (such as name, address, constitution or other information etc.) entered by the business entities formed as society/ partnership organization, a message will be sent to the concerned departments through the MAITRI portal, and accordingly the departments should update their information. A message will also be sent to the applicant if the applicant has to enter additional information, after which applicant can complete the formalities. In addition, the Department, which is prohibited by law from approving such changes, shall inform the applicant of the procedures involved for the desired permission and shall notify them of the submission of a new application.

7. For facilitation of investors in accordance with Business Reform Action Plan and in order to exchange information and guidance in both ways i.e. from Government to Business (G2B) and from Business to Government (B2G), General Manager, District Industries Centre is appointed as district level relationship manager. For grounding of investments, General Manager, District Industrial Centre shall function as a Relationship Manager and shall extend assistance to the investors, entrepreneurs and businessmen with respect to their queries/ complaints related to industry/ business, and support with necessary information within stipulated timeframe, pertaining to permission, plot -related information in coordination with Maharashtra Industrial Development Corporation and officers in the MAITRI Cell for all other matters.

Code - 202410151703054810